**L. A. BILL No. XLIII OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE ESSENTIAL COMMODITIES ACT, 1955, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३.**

**अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९५५ चा १०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी १३३३-१ (१०४०-८-२०२३)

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ७ ची सुधारणा.

१९५५ चा १०.

**२.** अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणतीही व्यक्ती, खते (असेंद्रिय, सेंद्रिय व मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ याच्या खंड १९ च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करीत असेल तर, ती व्यक्ती, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल, परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, अथवा या दोन्ही शिक्षांस पात्र असेल.";

(२) पोट-कलम (३) मधील,—

(क) "पोट-कलम (१) खालील" या मजकुराऐवजी, "पोट-कलमे (१) व (१क) या खालील" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) "त्या पोटकलमाखालील" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे तेथे त्याऐवजी, "त्या पोट-कलमांखालील" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक १० यामध्ये नवीन कलम १०क-१ समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०क नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असणे.

१९७४ चा २.

"**१०क-१.** या अधिनियमात किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ७ च्या पोट-कलम (१क) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध, दखलपात्र व अजामीनपात्र असेल.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) हा, सर्वसामान्य जनतेच्या हितार्थ, विवक्षित विक्रेय वस्तूंचे उत्पादन, पुरवठा व वितरण आणि त्यांचा व्यापार व वाणिज्य यांचे नियंत्रण करण्यासाठी तरतूद करण्याकरिता, अधिनियमित केला आहे. अजैविक, जैविक व मिश्र खतांचे उत्पादन, पुरवठा व वितरण आणि त्यांचा व्यापार व वाणिज्य यांचे नियंत्रण करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, भारत सरकारने, खते (असेंद्रिय, सेंद्रिय किंवा मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ काढला आहे. उक्त आदेशाच्या खंड १९ मध्ये, खतांचे उत्पादन किंवा आयात, विक्री व वितरण यांवर निर्बंध घालण्याची तरतूद केलेली आहे.

२. असे निदर्शनात आले आहे की, अनेक उत्पादक, वितरक, विक्रेते व व्यक्ती भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाच्या खतांचे उत्पादन, पुरवठा, वितरण किंवा विक्री करण्यामध्ये गुंतलेले आहेत. असे उत्पादन, पुरवठा, वितरण किंवा विक्री यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. म्हणून अशा उत्पादकांना, वितरकांना किंवा विक्रेत्यांना पायबंद घालण्याकरिता खते (असेंद्रिय, सेंद्रिय किंवा मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ याच्या खंड १९ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास त्याबाबतची शिक्षा वाढविण्यासाठी, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७ मध्ये, सुयोग्य सुधारणा करणे आणि उक्त अपराध दखलपात्र व अजामीनपात्र करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **छगन भुजबळ,**

दिनांक ३ ऑगस्ट, २०२३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

**सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक ४३—अत्यावश्यक वस्तु (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**(अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ यातील उतारे.)**

**(सन १९५५ चा अधिनियम क्रमांक १०)**

**१.** ते **६.** ** ** **

**७.** (१) व (२) ** ** ** शिक्षा

(२क) ** ** **

(३) एखादी व्यक्ती पोट-कलम (१) खालील अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली असून जर अत्यावश्यक वस्तूबाबत आदेशाचे व्यतिक्रमण केल्याबद्दल त्याच पोटकलमाखाली ती पुन्हा सिद्धदोष ठरली असेल तर, ज्या न्यायालयाने तिला सिद्धदोष ठरवले ते न्यायालय त्या पोटकलमाखाली देण्यात येईल अशा कोणत्याही दंडाव्यतिरिक्त, आदेशाद्वारे, त्या व्यक्तीने आदेशात न्यायालयाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे किमान सहा महिने इतक्या कालावधीत त्या अत्यावश्यक वस्तूच्या संबंधात कोणताही व्यापारधंदा चालवू नये असे निदेशित करील.

**७क.** ** ** **

**८.** ते **१६.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३]**

**[अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. छगन भुजबळ,**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई